# डिकेएमएम होमियोपॅथीक मेडिकल कॉलेज मध्ये जागतीक योगा दिन संपन्न

डिकेएमएम होमियोपॅथीक महाविद्‌यालयामध्ये २१/०६/२०१८ रोजी जागतीक योगादिना निमित्त्त सकाळी ७:०० वाजता विशेष योग शिबीर घेण्यात आले. महाविद्‌यालयाच्या प्रांगणात योग प्रशिक्षक श्री.सुदाम अहेर यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळया प्रकारचे योगासने व प्राणायाम करण्यात आले. त्यानंतर घेण्यात आलेल्या विशेष योग सभेत महाविद्‌यालयाचे वैद्‌यकिय अधिक्षक डॉ.प्रकाश एम.झांबड यांनी सर्व उपस्थीताचे अभिनंदन केले व नियमीत योग साधनेचे आवाहन केले. प्राचार्य डॉ.राजेश एम.पाटणी यांनी दर महिण्याच्या २१ तारखेला विशेष शिबीराचे आयोजन करण्यात येईल व वसतीगृहातील विद्‌यार्थी व विद्‌यार्थीनीसाठी रोज सकाळी योग सराव दिल्या जाईल असे प्रतिपादन केले. सदरील शिबीरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयसेवक व समन्वयक डॉ.विद्‌यानंद आठवले यांनी विशेष परिश्रम घेतले सदर शिबीराला डॉ.अरुण देशपांडे, डॉ.अशोक कोठारी, डॉ.सुरेश ताठे, डॉ तन्मय मित्रा, श्री.बी.एस.पाटील, सौ.शुभदा अरणकल्ले, सौ.सुरेखा पोकळे, सौ.उज्वल देसाई तसेच महाविद्‌यालयाचे शिक्षक तसेच शिक्षकेत्त्तर कर्मचारी व विद्‌यार्थी, विद्‌यार्थीनी मोठया संख्येने उपस्थीत होते.

